# गडचिरोली जिल्हा पोलीस शिपाई भरती सन -२०२२

***जाहिरात क्रमांक :-पोअग/प्रलि/पो.भ.२०१९/२०२२ गडचिरोली, दिनांक :- १७/०५/२०२२***

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा व शासन निर्णयाचे अनुषंगाने पोलीस अधिक्षक, गडचिरोली आस्थापनेवरील दिनांक ३१/१२/२०२० रोजी रिक्त असलेली १३६ पदे भरण्याकरीता, पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

पोलीस भरती करीता प्रमाणीत बिंदुनामावलीनुसार खालील प्रमाणे पदे उपलब्ध आहेत. त्याकरीता केवळ गडचिरोली जिल्हयातील रहिवासी आवेदन अर्ज करु शकतात. तसेच हे उमेदवार नियुक्ती झाल्यानंतर आंतरजिल्हा बदली साठी पात्र असणार नाहीत.

**पोलीस शिपाई : पदसंख्या**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | ० | ३ | ३७ | ६ | ३ | ७ | १ | १ | ७८ | ० | १३६ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | २ | १० | ३ | २ | ४ | १ | १ | २३ | ० | ४६ |
| महिला | ० | १ | ११ | २ | १ | २ | ० | ० | २३ | ० | ४० |
| खेळाडु | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ६ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ६ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ |
| माजी सैनिक | ० | ० | ६ | १ | ० | १ | ० | ० | १२ | ० | २० |
| अंशकालीन पदवीधर | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ६ |
| पोलीस पाल्य | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ |
| गृहरक्षक दल | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ६ |
| एकूण | ० | ३ | ३७ | ६ | ३ | ७ | १ | १ | ७८ | ० | १३६ |

टिप :- वर दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांमधुन अनाथ उमेदवारांकरीता १% (१३६ *१% = १.३६ म्हणजेच १ पद) उपलब्ध आहे. कागदपत्र तपासणी/ निवड यादी तयार करताना अनाथ उमेदवार ज्या प्रवर्गातील असेल त्या सामाजीक प्रवर्गाच्या सर्वसाधारण समांतर आरक्षणामधुन कमी करण्यात येईल.

अ) उपरोक्त पदे ही पोलीस अधिक्षक, गडचिरोली कार्यालयातील दिनांक ३१/१२/२०२० रोजी रिक्त असलेल्या पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

Rojgarmarathi.com

